THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 15TH AUGUST 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख ३१ माहे जुलई सन १८९१.

नंबर ५८०६.—हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असेः—

" फिनान्स ॲण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

स्टांप.

मुकाम सिमला, तारीख २३ माहे जुलई सन १८९१.

नंबर ३४८४ एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ला) ह्याच्या ८ व्या कलमावरून दिलेले अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावीत आहेत कीं, मक्तेदारांनीं आपले मक्ते योग्य रीतीनें पुरे करण्याबद्दल जंगलखात्यास द्यावयाची यादी (मेमोराण्डम) अगर त्या खात्याबरोबर करावयाची कबुलायत यांच्या स्वरूपाच्या दस्तऐवजांबद्दल सदरहू आक्टाअन्वयें जी ड्यूटी पडेल ती माफ केली आहे.

(सही) जे. एफ्. फिन्ले,

सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल.

ह्यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मांटीथ,

आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख १० माहे जुलै सन १८९९.

नंबर ५२१५.—हिंदुस्थान सरकारचे खालीं दिलेले जाहिरनामे पुनः प्रसिद्ध केले आहेत :—

"फिनान्स अॅण्ड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

### स्टांप.

मुकाम सिमला, तारीख ९ माहे जुलै सन १८९९.

नंबर ३१६४-एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याच्या ८ व्या कलमांत दिलेले अधिकार चालवून, आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं—

(१) फक्त एकेरी प्रवासाकरितां चालणारी रेल्वेवरील अपायांबाबदची कोणतीही विम्याची पालिसी, कोणत्याही रेल्वेवरून दर्म्यानच्या किंवा तिसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या उतारूस देण्यांत आली असतां तिजवर पडणारी ड्यूटी माफ केली आहे; आणि

(२) अशी कोणतीही पालिसी, कोणत्याही रेल्वेवरून पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या उतारूस दिली असतां तिजवर पडणारी ड्यूटी कमी करून ती एक आणा ठरविली आहे.

सेपरेट रेव्हिन्यू.

### स्टांप.

नान्-जुडिशियल स्टांप.

मुकाम सिमला, तारीख ९ माहे जुलै सन १८९९.

नंबर ३१९०-एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला) याचीं कलमें ९ व ५६ यांत दिलेले अधिकार चालवून, आणि हिंदुस्थान सरकारचा फिनान्स अॅण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर ३२८२*, तारीख २८ माहे जुलै सन १८९३ हा रद्द करून, आली जनाब गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावीत आहेत कीं जाहिरनामा नंबर २१७०*, फिनान्स अॅण्ड कामर्स डिपार्टमेंट, तारीख २२ माहे मे सन १८९१, यांत प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं कानू ८ व १० यांमध्यें खालील सुधारणा केल्या पाहिजेत. त्या येणेंप्रमाणें:—

(१) ८ व्या कानूमध्यें ' रंगून ' हा शब्द गाळला पाहिजे आणि 'कमिशनरानें' या शब्दानंतर 'किंवा रंगून एथें सब-रजिस्ट्रार आफ् डीड्स यानें' हे शब्द जास्त दाखल केले पाहिजेत.

(२) १० व्या कानूची रकम (अ) हिस्या शेवटीं ' आणि रंगून येथील सब-रजिस्ट्रार आफ् डीड्स व मोलमेन, अकयाब व बसीन एथील तिजोरी अमलदार ' हे शब्द जास्त दाखल केले पाहिजेत, आणि त्याच कानूची रकम (ब) हिस्याबद्दल खालील रकम दाखल केली पाहिजे. ती येणेंप्रमाणें :—

'(ब) मद्रास, मुंबई, व लाहोर एथील स्टांपांचे सुपरिंटेंडेंट.'

(सही) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार."

आलीजाह नेक नामदार गव्हर्नरसाहेब बहादूर इन् कौन्सिल
ह्यांच्या हुकुमावरून,
जे. मान्टीथ,
आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

*तारीख ३ माहे आगष्ट सन १८९३ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, याच्या ६९१ व्या पृष्ठावर पुनः प्रसिद्ध केला आहे आणि तारीख २८ माहे मे सन १८९१ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, याचीं पृष्ठें ४२५ ते ४२७ यांवर पुनः प्रसिद्ध केला आहे.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.